RNI No. MAHBIL/2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ६, अंक ९५]    गुरुवार, ऑक्टोबर ८, २०२०/आश्विन १६, शके १९४२    [पृष्ठे ४२, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २३५**

**प्राधिकृत प्रकाशन**

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

**उच्च व तंत्रशिक्षण विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ८ ऑक्टोबर २०२०.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र विना अनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश शुल्क यांचे विनियम) अधिनियम, २०१५.**

क्रमांक: टीईएम-२०२०/प्र.क्र.७१/तांशि-४.----महाराष्ट्र विना अनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम,२०१५ (२०१५ चा महा.२८) च्या कलम ३ ची पोट कलमे (१) व (२) तसेच कलम २ चा खंड (द) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, शासन अधिसूचना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक. टीईएम-२०१९/ प्र.क्र.४१/ तांशि-४, दिनांक ४ जून,२०१९ अधिक्रमित करून,आणि महाराष्ट्र शासन, याद्वारे,-

(एक) या सोबत जोडलेल्या अनुसूची - क च्या स्तंभ (२) मध्ये नमूद केलेले व्यवसायिक शिक्षण पदवीपूर्व पाठ्यक्रम हे, पूर्ण वेळ व्यावसायिक शिक्षण असल्याचे अधिसूचित करीत आहे आणि उक्त अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये नमूद केल्याप्रमाणे उक्त व्यवसायिक पाठ्यक्रमांच्या प्रवेशाच्या पात्रतेच्या अटी व शर्ती विनिर्दिष्ठ करीत आहे;

(दोन) या सोबत जोडलेल्या अनुसूची - ख च्या स्तंभ (२) मध्ये नमूद केलेले व्यवसायिक शिक्षण पदव्युत्तर पदवी पाठ्यक्रम हे, पूर्ण वेळ व्यावसायिक शिक्षण असल्याचे अधिसूचित करीत आहे आणि उक्त अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये नमूद केल्याप्रमाणे उक्त व्यवसायिक पाठ्यक्रमांच्या प्रवेशाच्या पात्रतेच्या अटी व शर्ती विनिर्दिष्ठ करीत आहे.